SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
वेबसाईट : ( www.unishivaji.ac.in)
E-mail : coe@unishivaji.ac.in, appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– परीक्षक नियुक्ती विभाग 2609101, 2609102, 2609103, 2609491
Estd. 1962
NAAC 'A' Grade

शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/116

दिनांक : 07/10/2019

प्रति,
मा. अधिविभाग प्रमुख/प्राचार्य/संचालक
सवं संलग्नित एस. आर. पी. डी. संबंधित महाविद्यालये व परिसंस्था व विद्यापीठ अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : व्दितीय मॉक टेस्ट बाबत
संदर्भ : 1) शिवाजी विद्यापीठ /परीक्षक नियुक्ती /338 दि. 23/08/2019 चे परीपत्रक
2) शिवाजी विद्यापीठ/परीक्षक नियुक्ती/आव्हीसी/62 दि. 25/09/2019 चे पत्र

महोदय/महोदया,

ऑक्टो./नोव्हें 2019 मध्ये होणा–या विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील संदर्भांकित अनु.क. एक मधील परीक्षेच्या प्रश्नपत्रिका SRPD माध्यमातून E-mode द्वारे वितरीत करणेत येणार आहेत.

उपरोक्त संदर्भांकित अनु. क. दोन अन्वयेच्या पत्राने मंगळवार दि. 01/10/2019 रोजी दु. 12:00 वाजता मॉक टेस्ट आयोजित करणेत आली होती.

उपरोक्त मॉक टेस्ट ब–याच महाविद्यालयांनी घेतली नसलेने तसेच SRPD नोंदणी करून SRPD Proforma या कार्यालयास सादर न केलेने पुन्हा शनिवार दि. 12/10/2019 रोजी 12:00 वाजता मॉक टेस्ट घेणेत येणार आहे. सकाळी 10:00 ते 12:30 या कालावधीमध्ये महाविद्यालयास नमुना प्रश्नपत्रिका डाउनलोड करण्यास उपलब्ध असेल. त्यानंतर सदरची प्रकिया बंद होइल.

तरी SRPD संबंधित ज्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे SRPD पोर्टलवर रजिस्ट्रेशन ( नांव, मोबाइल नं. , ई–मेल आयडी ) झालेले नाही त्यांनी तात्काळ रजिस्ट्रेशन करावे आणि परीक्षक नियुक्ती विभागामध्ये Proforma हार्ड कॉपी मध्ये तात्काळ जमा करावयाचे आहे.

तसेच त्याची एक प्रत appointment.a@unishivaji.ac.in , appointment.b@unishivaji.ac.in या ई–मेल वरही पाठवून देणेत यावी. या संबंधी काही अडचण असल्यास श्री. आर. व्ही. चव्हाण ( प्रि–एक्झाम ) 0231/2609102/9103 व एस आर पी डी तंत्रज्ञ श्री. प्रशांत इथापे, भ्रमणध्वनी क. 9922932895 वर संपर्क साधावा व दि. 11/10/2019 पर्यंत रजिस्ट्रेशन पूर्ण करणेत यावे.

कळावे,

आपला विश्वासू

उपकुलसचिव

सोबत : 1. Mock Test परीक्षा यादी
2. Proforma व सुचनापत्र

( टिप : दि. 01/10/2019 रोजीच्या मॉकटेस्टमध्ये ज्या महाविद्यालयांनी घेतली आहे. त्यांनी कृपया सदर पत्र नजरअंदाज करावे.)

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :- 2609102, 2609103

Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/ आरव्हीसी /62

दि. २५/०९/२०१९

प्रति,
मा. अधिविभाग प्रमुख/प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित एस.आर.पी.डी संबंधित महाविद्यालये व परिसंस्था व विद्यापीठ अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:- माहे ऑक्टो./नोव्हें. २०१९ परीक्षेच्या SRPD प्रणालीतील प्रश्नपत्रिका डाऊनलोडिंग मॉक टेस्ट बाबत.....

संदर्भ:- शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/३३८ दि. २३.०८.२०१९ चे परिपत्रक

महोदय/महोदया,

ऑक्टो./नोव्हें २०१९ मध्ये होणा-या विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील सोबत जोडलेल्या यादीमधील परीक्षेच्या प्रश्पपत्रिका SRPD माध्यमातून E-mode व्दारे वितरीत करणेत येणार आहेत.

या संदर्भात आपणांस अवगत करण्यात येते की, अद्यापी ज्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे SRPD पोर्टलवर रजिस्ट्रेशन (नाव, मोबाईल नं. ई मेल आयडी) झालेले नाही त्यांनी तात्काळ रजिस्ट्रेशन करावे परीक्षक नियुक्ती विभागामध्ये Proforma हार्ड कॉपी मध्ये तात्काळ जमा करावयाचा आहे. यासंबंधी काही अडचण असल्यास श्री. आर. व्ही. चव्हाण (प्री-एक्झाम) ०२३१-२६०९१०२/९१०३ व एसआरपीडी तंत्रज्ञ श्री. प्रशांत इथापे, भ्रमणध्वनी क्रमांक ९९२२९३२८९५ वर संपर्क करावा व दि. २७.०९.२०१९ पर्यंत रजिस्ट्रेशन पूर्ण करण्यात यावे.

SRPD माध्यमातून प्रश्नपत्रिका वितरण/डाऊनलोड/फाईल ओपन होणे यामध्ये ऐनवेळी काही अडचणी उदभव नयेत याकरिता मंगळवार दि. ०१.१०.२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता मॉक टेस्ट घेण्यात येईल. सकाळी १०.०० ते १२.३० या कालावधी मध्ये महाविद्यालयास नमुना प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्यास उपलब्ध असेल. त्यानंतर सदरची प्रक्रिया बंद होईल.

तरी SRPD संबंधित सर्व महाविद्यालयांनी मॉक टेस्ट मध्ये सहभाग नोंदविणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी.

कळावे ,

आपला विश्वासू

उपकुलसचिव

सोबत : १. Mock Test परीक्षा यादी
२. Proforma व सुचनापत्र

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :- 2609102, 2609103
Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/ ३३८ दि.२३/८/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख
सर्व संलग्नित एस.आर.पी.डी संबंधित महाविद्यालये व परिसंस्था व विद्यापीठ अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:- ऑक्टो./नोव्हें., २०१९ या हिवाळी सत्रातील लेखी परीक्षेसाठी प्रश्नपत्रिकाचे वितरण ई-मोडद्वारे म्हणजेच एसआरपीडी (Secured Remote Paper Delivery System) प्रणालीमधून करणेबाबत...

महोदय/महोदया,

वरील विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, राजेश अग्रवाल समितीच्या शासनमान्य शिफारशीनुसार ई-मोडद्वारे (SRPD) प्रश्नपत्रिका वितरणाचे कामकाज विद्यापीठाकडून ऑक्टोबर २०१२ परीक्षांपासून सुरू केलेले आहे. आपण आणि आपले सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अत्यंत उत्तम सहकार्य केल्यामुळे आपण ही योजना यशस्वीपणे राबवित आहोत. मा. कुलगुरु यांनी याची विशेष प्रशंसा केली आहे याचा मला अभिमान वाटतो. मी विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने आपणा सर्वांना धन्यवाद देतो.

मार्च/एप्रिल/मे, २०१७ पासून मार्च/एप्रिल २०१९ पर्यंत खालील अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिकांचे वितरण SRPD प्रणालीतून करण्यात आले आहे.

| Sr No | Name of the Course | No. of Centre | Sr No | Name of the Course | No. of Centre |
|---|---|---|---|---|---|
| 1 | All Engg. UG, PG (Excluding Graphics) (F.E.To B.E. & M.E.) | 35 | 2 | M.Sc. (All) | 49 |
| 3 | MBA – CBCS | 24 | 4 | B.I.D. | 1 |
| 5 | Law – L.L.B. | 7 | 6 | B.F.T.M. | 1 |
| 7 | LL.M. | 2 | 8 | B.D.F.C. | 1 |
| 9 | B.Arch./ | 6 | 10 | B.Des. | 2 |
| 11 | M.Arch | 1 | 12 | M.C.A.(Engg.) | 1 |
| 13 | B.Pharm. | 17 | 14 | MCA (Comm.) | 7 |
| 15 | M.Pharm. | 13 | 16 | MCA (Science) | 8 |
| 17 | B.Tech. | 1 | 18 | B.Text | 1 |
| 19 | M.Tech. | 1 | 20 | M.Text | 1 |
| 21 | B.Com (Sem.I to VI) | 114 | 22 | M.Com- (CBCS) | 80 |
| 23 | MCA Commerce (Old/Credit) | 1 | 24 | MCA Commerce (Old/Regular) | 6 |
| 25 | MBA (Dist./Exe.) | 4 | 26 | MCA Commerce (Bridge Course) | 6 |
| 27 | MBA (Regular) (70:30) | 24 | 28 | MBA (Textile) | 1 |
| 29 | B.Com. Bank Management | 1 | 30 | B.Com. IT | 2 |
| 31 | YCSRD MCA (RI) | 1 | 32 | YCSRD MSW | 1 |
| 33 | YCSRD MBA (Rural Mgt.) | 1 | 34 | YCSRD MRS | 1 |
| 35 | BBA Sem I to VI | 23 | 36 | B.A. Sem VI | 135 |
| 37 | B.Sc. Sem V | 80 | 38 | B.Sc. Sem. VI | 80 |
| 39 | BCA Sem I to VI | 51 | 40 | BCS/B.Sc.Computer Science Sem I to VI | 19 |
| 41 | B.A.Sem V | 135 | 42 | B.Sc. (IT) Sem I to VI | 1 |
| 43 | B.Sc. Regular Sem I to IV | 80 | 44 | B.Sc. Food Processing & Packaging Sem I to VI | 1 |
| 45 | B.Sc. Forensic Science Sem I to VI | 1 | 46 | B.Sc. Bio Technology (Entire) Sem I to VI | 5 |
| 47 | B.Sc. Animation Sem I to VI | 1 | 48 | B.Sc. Nano Science & Tech. Sem I to VI | 2 |
| 49 | B.Sc. Sugar Tech.Sem I to VI | 1 | 50 | M.A. (All) | 87 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 51 | M.A. Yoga | 1 | 52 | B.Ed. | 34 |
| 53 | M. S. W. | 1 | 54 | M.Ed | 7 |
| 55 | B. S. W. | 1 | 56 | B. P. Ed | 4 |
| 57 | B.A. B.Ed | 2 | 58 | B.Ed.-M.Ed | 1 |

वर नमूद परीक्षेचे प्रश्नसंच ई-मोडद्वारे (SRPD) पाठविण्यात येणार आहेत. या कामी महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालकाचे नाव, ई-मेल आयडी व मोबाईल नंबर इत्यादिची माहिती तात्काळ suk.digitaluniversity.ac या पोर्टलवर कार्यशाळांमधून दिलेल्या सूचनेप्रमाणे भरुन सोबतप्रमाणे त्याची एक हार्ड कॉपी या कार्यालयास पाठविण्यात यावी.

एसआरपीडीद्वारे परीक्षेसाठी खालीप्रमाणे मनुष्यबळाची नेमणूक करण्यात यावी. त्यांचे मानधन विद्यापीठ नियमानुसार आदा करणेत यावे.

१. उत्तम संगणक ज्ञान अवगत असणारा एक अधिकचा वरिष्ठ पर्यवेक्षक
२. संगणक ज्ञान अवगत असणारा एक शिक्षकेत्तर कर्मचारी
३. एक शिपाई

## - महत्वाच्या सूचना -

अ) सर्व कामकाज अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक यांच्या देखरेखीखाली गोपनीय पध्दतीने करण्याचे आहे. कामकाज सुरू करण्यापूर्वी कामकाजात सहभागी असलेल्या सर्वांनी त्यांचे मोबाईल सिनिअर सुपरवायझर यांच्या कस्टडीत स्वीच ऑफ करुन ठेवण्याचे आहेत. अधिकृत सिनिअर सुपरवायझर यांचा विद्यापीठास नोंद केलेल्या नंबरखेरीज अन्य कोणाचेही मोबाईल या कामावेळी सुरू ठेवण्याचे नाहीत.

ब) संबंधित महाविद्यालयाने प्रश्नपत्रिकाच्या छायाप्रतीसाठी आवश्यक उदा. कागद, टोनर इ. अत्यंत तातडीने खरेदी करुन ठेवावा, झेरॉक्स/कॉपीयर/हाय स्पीड प्रिंटर मशिनची योग्य ती देखभाल करुन घेण्यात यावी. ऐन वेळी या संबंधी कोणतीही अडचण निर्माण होवू देवू नये.

क) छायाप्रतीसाठी होणारा खर्च प्रती कॉपी ५० पैसे या दराने विद्यापीठाकडून देय राहील. सदर रक्कम परीक्षा कामकाजासाठी देण्यात आलेल्या अग्रीम/तसलमातमधून खर्ची टाकण्याची आहे. एकुण झालेल्या झेरॉक्स कॉपीची नोंद विद्यापीठाने पुरविलेल्या SRPD प्रश्नपत्रिका झेरॉक्स हिशोब रजिस्टरमध्ये घेवून उपस्थितांची सही करुन कागद हिशोब मशिनरिडींगसह प्रमाणित करावयाचा आहे. खराब प्रतींची सुध्दा स्वतंत्र नोंद करण्याची असून त्या प्रती बंद लखोटयात निकाल जाहिर होईतोपर्यंत ठेवणेच्या आहेत.

ड) SRPD द्वारा परीक्षेच्या कामाची गोपनियता राहण्यासाठी शक्यतो प्राचार्यांच्या दालना शेजारी परीक्षा स्ट्रॉगरुम असावी व सदर कक्ष सी.सी.टी.व्ही. निगरानीखाली असावा व त्याबाबतचे रेकॉर्डींग विद्यापीठास मागणीप्रमाणे उपलब्ध व्हावे.

इ) स्ट्रॉग रुममध्ये खालील सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

१. सुसज्ज इंटरनेट सुविधा किंवा कोणत्याही कंपनीचे सर्व ठिकाणी ॲक्सेस/रेंज असणारे युएसबी मोडेम/डोंगल

२. इंटरनेट एक्स्प्लोरर किंवा गुगल क्रोम ब्राऊजर असलेले दोन स्वतंत्र संगणक बॅकअप सुविधेसह व अपडेटेड ॲन्टिव्हायरससह तसेच Adobe pdf reader 11 किंवा त्यापुढील pdf software तसेच WIN RAR software ची सुविधा उपलब्ध करून घ्यावी.

३. या संगगकांचा वापर परीक्षा कालावधीत फक्त प्रश्नपत्रिकांकरिता करावा, इतर कोणतेही प्रोग्रॅम सदर संगणकावर Install करु नयेत वा परीक्षा कालावधीत अन्य कामकाज करू नये.

४. स्वतंत्र सुस्थितीमधील हायस्पीड प्रिन्टर/कॉपीअर मशिन व जनरेटर किंवा इनर्व्हरटर सुविधा असावी.

फ) प्रश्नपत्रिका डाऊनलोड करून वितरित करण्याच्या कालावधीत म्हणजेच सदर कामकाज सुरू असताना महाविद्यालयांच्या स्ट्रॉग रुममध्ये वरील अधिकृत व्यक्तिंखेरीज अन्य व्यक्तिंचा वावर प्रतिबंधित करावा. सर्व कामकाज गोपनीयरित्या पूर्ण केल्याशिवाय सदर स्ट्रॉग रूम उघडू नये.

ग) सिनिअर सुपरवायझर्सनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी व परीक्षा सुरु असताना कोणत्याही प्रकारचे प्रिंट/इलेक्ट्रानिक माध्यमातुन गोपनिय दस्तऐवज बाहेर जाणार नाही याची सक्त दक्षता घ्यावयाची आहे. असे आढळल्यास संबंधितावर माहिती तंत्रज्ञान कायदा (IT Act ) Section 66 ते 72 नुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ह) प्राचार्यांनी आपली SRPD नोंदणी स्वत: करणेची आहे. प्राचार्यांनी यापूर्वी केलेली नोंदणी उपयोगात येणार आहे परंतू त्यामध्ये काही बदल असल्यास तोही करण्यात यावा. सनिअर सुपरवायझर यांचेवर परीक्षा केंद्रावर दोन तास अगोदर उपस्थित राहून पेपर डाऊनलोड करण्याची कार्यवाही गोपनीयरित्या पार पाडण्याची अधिकृत जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. याबाबत काही अडचण किंवा शंका असल्यास परीक्षक नियुक्ती विभागास ०२३१-२६०९१०१, २६०९१०२, २६०९१०३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## - प्रश्नपत्रिका प्रिंट व प्रश्नपत्रिकांचे वितरण -

- महाविद्यालयीन स्तरावर परीक्षेतील समरी सीट नुसार प्रत्येक विषयाची ब्लॉक नुसार बैठक व्यवस्था करणेत यावी.
- प्रत्येक दिवशी परीक्षेपूर्वी स्लॉटच्या निर्धारित वेळेत प्रश्नपत्रिका download करुन घेवून विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात त्याच्या झेरॉक्स कॉपीज काढून घ्याव्यात. एक पेक्षा अधिक पाने असतील तर पाठपोठ प्रिंट घ्यावी आवश्यकतेनुसार स्टेपलींग करुन घेण्यात यावे.
- प्रश्नपत्रिका प्रती ब्लॉक वाईझ व लखोटयात भरुन सिलबंद कराव्यात नंतर कनिष्ठ पर्यवेक्षकांनी त्याचे सिल उघडावे पेपर सुरु होण्यापूर्वी किमान पंधरा मिनिटे अगोदर सर्व प्रकिया पूर्ण करण्यात यावी.
- *विद्यार्थीसंख्या व काढलेल्या प्रश्नपत्रिकांच्या प्रिंट आणि वापरलेल्या प्रिंट यांचा तपशील विद्यापीठाने SRPD साठी पुरविलेल्या रजिस्टरवर नोंद करावी. सदर नोंद रजिस्टरवर ज्या त्या दिवशी करावी व प्राचार्यांची सही घ्यावी. तसेच भरारीपथकासही सदर नोंद रजिस्टर दाखवून त्यावर सही घ्यावी. सदर रजिस्टर कायमस्वरुपी जतन करणेचे आहे.*
- या कामी सर्व प्रकारे अत्यंत गोपनीयता ठेवण्यात यावी.
- बहि:स्थ, वरिष्ठ पर्यवेक्षक नियुक्तीसाठी तयार करण्यात आलेल्या महाविद्यालयांचे गटाप्रमाणे (Cluster) विद्यापीठाकडून वरिष्ठ पर्यवेक्षकांना नियुक्ती पत्रे पाठविण्यात येतील.

## SRPD नोंदणी कार्यपध्दती

ई-मोडद्वारे प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्यासाठी नोंदणी करण्यासाठी खालील तपशीलवार सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी. (सदर **PPT-suk.digitaluniversity.ac** वर देखील उपलब्ध आहे.)

१ http://suk.digitaluniversity.ac हे पोर्टल ओपन करावे.

२ महाविद्यालयास दिलेल्या User ID व Password द्वारे Log In करावे.

३ त्यानंतर *College Defination* या लिंकला क्लिक करावे. .Define College

४ त्यानंतर *Other Information* या लिंकला क्लिक करून प्राचार्यांची माहिती (संपूर्ण नांव, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी) अपडेट करावी.

५ त्यानंतर ***Supervisor Details*** या लिंकला क्लिक करावे. त्यानंतर ***New*** या लिंकला क्लिक करून सिनिअर सुपरवायझरची माहिती भरून वन टाईम पासवर्डच्या मदतीने ***Registration*** पूर्ण करावे. रजिस्ट्रेशन पूर्ण करताना दिलेल्या मोबाईल नंबरवर व ई-मेल आयडीवर वन टाईम पासवर्ड (OTP) उपलब्ध होईल. तो योग्य त्या ठिकाणी टाकून *'Save'* बटनावर क्लिक करावे.

## *प्रत्यक्ष प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्याबाबतची कार्यपध्दती :*

१. प्रथम ***http://suk.digitaluniversity.ac*** या पोर्टलवर आपल्या नेहमीच्या कॉलेज युझर व पासवर्डने लॉगीन करावे.

२. त्यानंतर *"Pre-Examination"* या लिंकला क्लिक करावे.

३. त्यानंतर *"SRPD"* या लिंकला क्लिक करावे.

४. नंतर *"Download Question Paper"* या लिंकला क्लिक करावे. या लिंकमध्ये आपणास *टाईम स्लॉट* दिसेल. परीक्षेच्या वेळापत्रकानुसार *टाईम स्लॉट सिलेक्ट* करावा.

५. त्या स्लॉटला असणा-या पेपर्सची यादी आपणासमोर येईल. त्यासमोरील *डाऊन लोड* या बटनवर क्लिक करावे.

६. लगेचच प्रणालीमध्ये रजिस्टर केलेल्या मोबाईल नंबरवर एसएमएसद्वारे व ई-मेलवर *वन टाईम पासवर्ड OTP* उपलब्ध होईल. त्याच्या मदतीने प्रश्नपत्रिकेची झिप फाईल डाऊन लोड करून घ्यावी. त्यानंतर दुसरा पासवर्ड त्याच मोबाईल नंबरवर व/ई-मेलवर प्राप्त होईल. डाऊनलोड झालेली फाईल त्या पासवर्डच्या मदतीने Extract करून Save करावी व त्याच्या प्रिंट पान ३ वरील सुचनेप्रमाणे घ्याव्यात.

७. वरील क्रं. १ ते ६ यासाठी सूचनेप्रमाणे एकदाच क्लिक त्या-त्या लिंकसाठी करणेचे आहे. एक, दोन किंवा अधिक वेळा क्लिक केलेस तेवढया संख्येने OTP Generate होतात. त्यामुळे संभ्रमावस्था निर्माण होते. याकरिता एकदाच क्लिक करून थोडा वेळ थांबावे.

महत्वाचे : परीक्षा झाल्यानंतर प्रिंट झालेल्या प्रश्नसंचाची एकत्रित प्रत्येकी एक प्रत मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राने दिलेल्या पूर्व नियोजित लॉटनुसार उपकुलसचिव, मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व जिल्हानिहाय मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर जमा करावयाची आहे. वरील प्रक्रिया करताना कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास खालील मोबाईलवर विद्यापीठास कळवावे.

१. श्री. प्रशांत इथापे – ९९२२९३२८९५ २. ०२३१-२६०९१०२, २६०९१०३, २६०९१०१

सेबत SRPD नोंदणी Proforma जोडला असून SRPD नोंदणी करुन Proforma ची एक प्रत या विभागास पाठविणेची आहे. बरेच महाविद्यालय SRPD नोंदणी करणेस वेळ करतात. आणि परीक्षेच्या आदल्या दिवशी SRPD नोंदणी करुन Approval मागतात. अशा वेळी या विभागास ब-याच अडचणींना सामोरे जावे लागते. सबब SRPD नोंदणी करुन त्याची एक प्रत खाली नमूद केलेल्या तारखेपूर्वी या विभागास पाठवून देणेत यावी.

वरीलप्रमाणे ई-मोडद्वारे प्रश्नपत्रिका वितरणाचे कामकाज व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी आपण आणि आपल्या सर्व सहका-यांनी विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत : SRPD नोंदणी Proforma
(SRPD परीक्षेसाठी Online Registration करून सदर
Performa मधील माहिती भरून, परीक्षक नियुक्ती विभाग, रूम क्र. २०५, परीक्षा भवन क्र. १, शिवाजी विद्यापीठ, येथे दि. / /२०१९ पर्यंत पोष्टाने/हस्तेपोहोच पाठविण्याची व्यवस्था करावी.)

# Proforma for SRPD Registration

| College Code | College Name | Town/Village | Tahsil | District | Principal Name | Registered E-mail ID for SRPD | Registered Mobile No. for SRPD | Course/Exam Name |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

Seal

Sign

Name :-

Principal/Director/HOD

टिप - १. SRPD Registration Online करुनच उपरोक्त माहिती पाठविण्यात यावी. SRPD Registration Online मधील माहिती व प्रत्यक्ष SRPD Proforma मधील माहिती यात तफावत असू नये. तफावत असलेस SRPD Approval होणार नाही. त्यामुळे प्रश्नपत्रिका Download होणेस अडचण निर्माण होवू शकते.

२. उपरोक्त माहिती अचूकपणे प्राप्त होणेसाठी टाईप करुन देण्यात यावी, हस्तलिखित प्रत स्विकारली जाणार नाही याची कपया नोंद घ्यावी.

३. उपरोक्त प्रत पुढील पत्यावर प्राधान्याने दि.०५.०९.२०१९ पर्यंत (By post / By Hand)परीक्षक नियुक्ती विभाग रुम. क. २०५ परीक्षा भवन क.१ शिवाजी विद्यापीठ - ४१६-००४ येथे पाठविण्यात यावी.